संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

प्रभू श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ तोंडगांव व्दारा संचालीत

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

नॅक व्दारा 'ब' दर्जा प्राप्त

॥ आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वत: ॥

पदवी वितरण समारंभ

अहवाल

शै.सत्र-२०२४-२५

पदवी वितरण कार्यक्रमाची पत्रिका

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

प्रभु श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगांव संचालित

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

नॅक द्वारा 'ब' दर्जा प्राप्त

पदवी वितरण समारंभ

शुक्रवार, दि.०४/०४/२०२५ वेळ, : सकाळी १०.३० वा.

★ कार्यक्रम पत्रिका ★

कार्यक्रमाचे अध्यक्ष : डॉ.नारायणराव गोटे (अध्यक्ष, प्रभु श्री रामचंद्र शिक्षण प्रसारक मंडळ, तोंडगांव)

प्रमुख अतिथी : डॉ.कैलास दागडीया (राष्ट्रपती नियुक्त सदस्य, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा)

: डॉ.ए.जी.वानखेडे (सदस्य, व्या.अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, सं.गा.बा.अ.वि.अमरावती)

: मा.मिनाक्षी नागराळे (महराष्ट्र राज्य शासनाचा सावित्रीमाई फुले आदर्श गुणगौरव शिक्षिका पुरस्कार प्राप्त)

प्रमुख उपस्थिती : डॉ.जी.एस.कुबडे (प्राचार्य, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम.)

★ **विनीत** ★

डॉ.दिपक दामोदर (समन्वयक) डॉ.जी.एस.कुबडे (प्राचार्य)

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

पदवी वितरण समारंभ अहवाल

दिनांक—०४.०४.२०२५ स्थळ— मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम.

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे दि.04 एप्रिल 2025 रोजी विद्यापीठाने निर्देशित केल्यानुसार पदवी वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कैलासचंद्र दगडिया, डॉ. ए. जी. वानखेडे, सदस्य, व्या. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व मा. मीनाक्षी नागराळे यांची उपस्थिती होती. तर प्रमुख उपस्थितामध्ये तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एस. कुबडे व डॉ.बी.आर. तनपुरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. आपल्या प्रस्ताविकामध्ये डॉ. दिपक दामोदर यांनी पदवी वितरण समारंभ महाविद्यालय स्तरावर अयोजित करण्यामागील विद्यापीठाचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी वाड.मय स्नातक, वाणिज्य स्नातक व विज्ञान स्नातक शाखेतील विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक पदवी वितरीत करण्यात आली. त्यानंतर पदवीप्राप्त विद्यार्थीनी मानसी नाईकवाडे हिने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. कैलासचंद्र दगडिया यांनी पदवी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्याची एक नवीन सुरुवात आहे, आजच्या विद्यार्थ्यांनी व्यवसायभिमुख असावे असेही त्यांनी याप्रसंगी सांगितले. मीनाक्षी नगराळे यांनी आपल्या मनोगत विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या लक्षावर आपले मन व बुद्धी केंद्रित करून मार्गक्रमण करावे, तसेच विद्यार्थ्यांसाठीची पंचसूत्री त्यांनी सादर केली. डॉ. ए. जी. वानखेडे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवी घेउन समाधानी न राहता समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून समाज उन्नतीसाठी जे जे करता येईल त्यासाठी प्रयत्नशिल असले पाहिजे असे आवाहन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एस. कुबडे यांनी सुध्दा आपली मनोगत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. नारायणराव गोटे यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःला नेहमीच अद्ययावत ठेवावे, अहोरात्र परिश्रम घेऊन स्वतःचे आई-वडिलांचे व महाविद्यालयाचे नाव मोठे करावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. वैष्णवी ठाकरे हिने केले तर आभार प्रदर्शन डॉ. फिरोज एस. खान यांनी केले.

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना मिनाक्षी नागराळे मॅडम व इतर

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना डॉ.नारायणराव गोटे व इतर

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

डॉ.कैलासचंद्र दागडीया यांचे स्वागत करतांना डॉ.नारायणराव गोटे

डॉ.ए.जी.वानखेडे यांचे स्वागत करतांना डॉ.बी.आर.तनपुरे

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

मिनाक्षी नागराळे यांचे स्वागत करतांना डॉ.पी.एस.पाथरकर

मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

मान्यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

यवरांच्या हस्ते पदवी स्विकारतांना पदवीकांक्षी विद्यार्थी

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.कैलासचंद्र दागडीया सोबत इतर मान्यवर

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.नारायणराव गोटे सोबत इतर मान्यवर

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.ए.जी.वानखेडे सोबत इतर मान्यवर

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मिनाक्षी नागराळे सोबत इतर मान्यवर

पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.जी.एस.कुबडे सोबत इतर मान्यवर

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु.वैष्णवी ठाकरे

कार्यक्रमाचे अभार प्रदर्शन करतांना डॉ.फिरोज एस.खान

पदवी वितरण कार्यक्रमाचे फोटो

मान्यवरांसह पदवी प्राप्त विद्यार्थी

मान्यवरांसह पदवी प्राप्त विद्यार्थी

पदवी वितरण कार्यक्रमाची वृत्तपत्रातील कात्रण

देशोन्नती

गोटे महाविद्यालयात पदवीदान समारंभ

पदवी सोबतच व्यवसाय कौशल्य काळाची गरज-डॉ. गोटे

देशोन्नती वृत्तसंकलन

वाशिम : मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ०४ एप्रिल २०२५ ला विद्यापीठाने निर्देशित केल्यानुसार पदवी वितरण समारंभ घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायणराव गोटे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कैलासचंद्र दगडिया, डॉ. ए. जी. वानखेडे, सदस्य, अर्थशास्त्र अभ्यास मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, श्रीमती मीनाक्षी नागराळे, प्राचार्य डॉ. जी. एस. कुबडे व डॉ. बी. आर. तनपुरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. याप्रसंगी वाड. मय स्नातक, वाणिज्य स्नातक व विज्ञान स्नातक शाखेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक पदवी वितरीत करण्यात आली. आपल्या मार्गदर्शनात मान्यवरांनी पदवी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग असून, पदवीसोबतच विद्यार्थ्यांनी व्यवसाय कौशल्य सुद्धा प्राप्त करून घेणे काळाची गरज असल्याचे मत त्याने मांडले त्यासोबतच विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या लक्षावर आपले मन व बुद्धी केंद्रित करून मार्गक्रमण करावे, विद्यार्थ्यांनी केवळ पदवी घेउन समाधानी न राहता समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून समाज उन्नतीसाठी प्रयत्नशिल असले पाहिजे. पदवीदान दिन हा एका प्रवासाचा शेवट आणि दुसऱ्या प्रवासाची सुरुवात आहे, जो नवीन संधी आणि आव्हानांनी भरलेला आहे.

शिक्षक हे त्या ताऱ्यांसारखे असतात जे आपल्याला शिक्षणाच्या अंधारात मार्गदर्शन करतात. ते आपल्या मनाला ज्ञानाने उजळवतात आणि आपल्या सभोवतालचे जग समजून घेण्यास मदत करतात. ते आपले मित्र, मार्गदर्शक आणि आपले आदर्श आहेत. आपले शिक्षक आपल्याला केवळ विषयच नव्हे तर जीवनाचे महत्त्वाचे धडे देखील शिकवत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दीपक दामोदर यांनी केले.

संचालन कु. वैष्णवी ठाकरे हिने केले उपस्थितांचे आभार डॉ. फिरोज एस. खान यांनी मानले. कार्यक्रमाला संजय गोटे, डॉ. व्ही एन लांडे, डॉ. पांडुरंग गोटे, डॉ. दिलीप लांजेवार, डॉ. एस. व्ही. प्रा. भारत पट्टेबहादूर, डॉ. विलास गायकवाड, प्रा. व्ही. आर. गोलाईत, प्रा. नयना मोतूळे, डॉ. आर. जी. बोन्डे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. ता. प्र.

Washim Edition
Apr 08, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com

पदवी वितरण कार्यक्रमाची वृत्तपत्रातील कात्रण

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात पदवीदान समारंभ

▶ महासागर प्रतिनिधी ▶

वाशिम - मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे दि.०४ एप्रिल रोजी विद्यापीठाने निर्देशित केल्यानुसार पदवी वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कैलासचंद्र दगडिया, डॉ. ए. जी. वानखेडे, सदस्य, व्या. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती व मीनाक्षी नागराळे यांची उपस्थिती होती. तर प्रमुख उपस्थितामध्ये तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे व डॉ. बी. आर. तनपुरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. आपल्या प्रस्ताविकामध्ये डॉ. दिपक दामोदर यांनी पदवी वितरण समारंभ महाविद्यालय स्तरावर अयोजित करण्यामागील विद्यापीठाचा उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी वाड. मय स्नातक, वाणिज्य स्नातक व विज्ञान स्नातक शाखेतील विद्यार्थ्यांना सन्मानपूर्वक पदवी वितरीत करण्यात आली. त्यानंतर पदवीप्राप्त विद्यार्थीनी मानसी नाईकवाडे हिने आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. कैलासचंद्र दगडिया यांनी पदवी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्याची एक नवीन सुरुवात आहे, आजच्या विद्यार्थ्यांनी व्यवसायभिमुख असावे असेही त्यांनी याप्रसंगी सांगितले. देउन सन्मानित केले जाते. मीनाक्षी नगराळे यांनी आपल्या मनोगत विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या लक्षावर आपले मन व बुद्धी केंद्रित करून मार्गक्रमण करावे, तसेच विद्यार्थ्यांसाठीची पंचसूत्री त्यांनी सादर केली. डॉ. ए. जी. वानखेडे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ पदवी घेउन समाधानी न राहता समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून समाज उन्नतीसाठी जे जे करता येईल त्यासाठी प्रयत्नशिल असले पाहिजे असे आवाहन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे यांनी सुध्दा आपली मनोगत व्यक्त केले.आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. नारायणराव गोटे यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःला नेहमीच अद्ययावत ठेवावे, अहोरात्र परिश्रम घेऊन स्वतःचे आई-वडिलांचे व महाविद्यालयाचे नाव मोठे करावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. वैष्णवी ठाकरे हिने केले तर आभार प्रदर्शन डॉ. फिरोज एस. खान यांनी केले. कार्यक्रमाला संजय गोटे, डॉ.व्ही एन लांडे, डॉ. पांडुरंग गोटे, डॉ.पी.एस. पाथरकर, डॉ. दिलीप लांजेवार, डॉ. एस. व्ही. रुक्के, प्रा. भारत पट्टेबहादूर, डॉ. विलास गायकवाड, प्रा. व्ही. आर. गोलाईत, प्रा. नयना मोतूळे, डॉ.आर. जी. बोन्डे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.